## प्रकरण दुसरे

## गौरी देशपांडे यांच्या कथात्म वाङ्मयातील

## आशयसूत्रांचे स्वरूप

# प्रकरण दुसरे

## गौरी देशपांडे यांच्या कथात्म वाङ्.मयातील

## आशयसूत्रांचे स्वरूप

### प्रस्तावना :

मानवी संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या इतिहासात पुरुषप्रधान, पितृसत्ताक समाजव्यवस्थेतील स्त्रीजीवनाचे चित्रण विविध वाङ्.मय कृतींमध्ये झालेले दिसते. स्त्री आणि पुरुष यांच्यात असलेल्या नैसर्गिक शरीररचना-भेदामुळे त्या दोघांमध्ये फरक केला जाऊन स्त्रीला दुर्बल ठरवून तिचा दर्जा दुय्यम मानला गेलेला दिसतो. पारंपरिक दृष्टिकोणातून पुरुष लेखकांनी स्त्रियांच्या समस्या, त्यांची दुःखे, त्यांचे अनुभवविश्व रेखाटण्याचा प्रयत्न केला. मात्र स्त्रियांनी रेखाटलेले, स्त्रियांचे दुःख, त्यांच्या समस्या यांचे ज्वलंत चित्र, त्यातील वास्तवदर्शी प्रखरता पाहण्यासाठी मराठी वाचकाला विभावरी शिरुरकरांच्या "कळ्यांचे निःश्वास" [१] (१९३३) पर्यंत वाट पहावी लागली. त्या काळातील समाजव्यवस्थेचा, समाजाच्या मानसिकतेचा विचार करता, विभावरीबाईंचा हा प्रयत्न निश्चितच स्तुत्य आहे.

दुसऱ्या महायुध्दानंतर संपूर्ण जगाचाच कायापालट झाला. त्याचा परिणाम म्हणून अपरिहार्यपणे स्त्रियांच्या जीवन जगण्याच्या पध्दतीत ही प्रचंड प्रमाणात बदल झालेला दिसतो. इंग्लड, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी या सारख्या प्रगत व बलाढ्य देशात देखील स्त्रियांवर अन्याय व अत्याचार होत होतेच. दुसऱ्या महायुध्दानंतर स्त्री मुक्ती चळवळीने प्रचंड वेग घेऊन स्त्रीलाही माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्राप्त करून देण्यासाठी युध्दपातळीवर संघर्ष सुरु केला. त्याचे पडसाद भारतासारख्या देशातही उमटले. स्वाभाविकपणे

ते महाराष्ट्रात आणि मराठी वाङ्.मयातही उमटले. १९६० नंतरच्या मराठी वाङ्.मयातील स्त्रीने लिंगभेद विरहित समाजव्यवस्थेची कल्पना मांडून आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील पुरुषाचे वर्चस्व धुडकावून लावलेले दिसते. तसेच पुरुषाचा, पुरुषप्रधान संस्कृतीचा व समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा परंपरागत चालत आलेल्या संकुचित दृष्टिकोणाचा पुरुषावर व स्त्रीवर कसा विपरीत परिणाम झाला याचे चित्रण केले. पुरुषाच्या दृष्टीने अभिप्रेत असलेले बाईपण नाकारले. बाईपणाशी निगडीत असलेल्या नैतिक कल्पना नाकारल्या आणि स्त्रीला व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा देण्याचा या कालखंडात यशस्वी प्रयत्न झालेला दिसतो. या लेखनामध्ये कमल देसाई, अंबिका सरकार, पद्मजा फाटक, गौरी देशपांडे यांचे लेखन विशेष उल्लेखनीय आहे.

गौरी देशपांडे यांनी स्त्रीला केंद्र कल्पून आपले कथालेखन केलेले आहे. १९७० पासून सातत्याने त्यांनी लेखन केले. गौरीबाईच्या एकंदर कथात्म साहित्यातील स्त्रीची व्यक्तिरेखा वैशिष्टयपूर्ण आहे. इतर मराठी कथांतून भेटणाऱ्या स्त्रियांपेक्षा अगदी वेगळ्या वृत्तीची, आधुनिक मनाची ही स्त्री आहे. ती आधुनिक, सुशिक्षित, मुळात मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेली, परंतु कालमानानुसार हळू हळू उच्चमध्यम वर्गीय समाजाच्या वर्तुळात वावरू लागलेली अशी स्त्री आहे. स्वतंत्र व मुक्त जीवन जगू इच्छिणारी स्त्री गौरी देशपांडयांच्या लेखनातून प्रकट होते. असे अनुभवाचे वेगळेपण असल्यामुळे त्यांच्या कलाकृतीमधील आशयसूत्रे ही स्वाभाविकपणे वेगळी आणि वैशिष्टयपूर्ण असतात.

गौरी देशपांडे यांच्या कथात्म लेखनाची वैशिष्टये पहात असताना त्यांच्या सर्व वाङ्.मयातून नजरेत भरणारे पहिले ठळक वैशिष्टय म्हणजे, त्यांच्या अनुभवांचे वेगळेपण होय. अनुभवांचे नाविण्य आविष्कृत करणे हा खरे तर प्रत्येक कलाकृतीचा धर्मच असतो, प्रत्येक कलाकृतीचे वैशिष्टय असते. जर

अनुभवाचे नाविण्य नसेल तर त्या कलाकृतीला अनुकरण म्हणावे लागेल. अनुकरण आणि अनुकृती यातील फरक ध्यानात घ्यायला हवा. अनुकरण निर्जीव असते. त्यात निव्वळ पुनरावृत्ती असते. त्यात हुबेहुब अथवा तंतोतंतपणा असू शकतो. पण कृत्रिमता नसते. अनुकृती ही सजीव असते आणि स्वायत्त असते. तिच्यात नवेपणा, सदासतेजपणा असतो. पुरातन काळापासूनच साहित्यात प्रेमानुभव, सृजनानुभव, संघर्षाचा अनुभव यांचे आविष्करण होत आलेले आहेच. परंतु हे आविष्करण एकसारखे नाही. प्रत्येक कलाकृतीमध्ये या अनुभवाचे नवीनच दर्शन घडते. जर अनुभवाचे नाविण्यच नसेल तर ती कारागिरी म्हणावी लागेल. तिला कलाकृतीचा दर्जा प्राप्त होऊ शकणार नाही.

गौरी देशपांडे यांच्या कथात्म वाङ्.मयात अनुभवाचे नाविण्य आढळते. स्त्री चे स्वतंत्र व्यक्तिमत्व, स्त्री-पुरुष यांच्यातील नातेसंबंध, त्यांच्या परस्पर संबंधातील अनुभव वेगळया पातळीवर चित्रित होताना दिसतात.

लेखक कथे सारख्या माध्यमातून व्यक्ती, समाजजीवन, वातावरण यांनी तयार होणारी सुसंबध्द रचना करीत असतो. अर्थपूर्ण वाटणारा, विशेषत्वाने जाणवणारा जीवनातला एखादा भाग, एखादा अनुभव त्याला आपल्या कलाकृतीतून आविष्कृत करावयाचा असतो. त्यात त्याला अर्थपूर्ण जीवनाचे अनेक पैलू उलगडून दाखवायचे असतात. लेखकाला अभिप्रेत असलेला जीवनार्थ म्हणजे त्याचा साहित्यकृतींचे आशयसूत्र. जीवनानुभव जेवढे गुंतागुंतीचे तेवढीच आशयसूत्रे गुंतागुंतीची असतात. आशयसूत्रे ही प्रधान तशीच गौण असू शकतात. कधीकधी ती समांतर असू शकतात. या आशयसूत्रांचा अधिकाधिक विकास करण्यासाठीच लेखक प्रयत्नशील असतात.

लेखक ज्या समाजात वावरतो, ज्या पध्दतीचे जीवन जगत असतो, त्या समाजातील प्रत्यक्ष जीवनातल्या आलेल्या अनुभवाद्वारे तो तेथील जीवनाचा पट

उलगडून दाखविण्याच्या प्रयत्नात असतो. समाजात आसपास घडणाऱ्या प्रत्येक लहानमोठ्या घटनेचा, प्रसंगाचा अन्वयार्थ तो स्वत:च्या दृष्टिकोणातून लावून पहात असतो आणि कथेत आविष्कृत करीत असतो. गौरी देशपांडे यांच्या कथेतही याचा प्रत्यय येतो.

भारतीय स्त्रीचा दर्जा हा "चूल आणि मूल" इथे पर्यंतच असावा. तिने चार भिंतींच्या आतच रहावे, तिला समाजात स्वतंत्रपणे वावरता येऊ नये, ही जुनी संकल्पना होती. ती आता मागे पडली आहे. स्त्रीलाही एक माणूस म्हणून जगता यावे, तिचा आदर व्हावा, तिने सुसंस्कृत बनावे, तिला स्वाभिमानाने जगता यावे, तिच्या विचारांना मोकळीक मिळावी, तिच्याकडे केवळ कामुक दृष्टीने न पहाता उज्ज्वल भविष्याच्या आशावादी धडपडीचा तिचा जो प्रयत्न आहे त्याकडे आदराने पहावे. तिच्या बुध्दीचा आदर करावा असा व्यापक परिप्रेक्ष्य असलेल्या स्त्रीवादी चळवळीने १९६० नंतर पुन्हा सर्वकष लढयाचे रूप धारण केले. पारंपरिक स्त्री चे रूढ आडाखे मोडले. विवाह संस्थेला हादरा दिला. अशी स्त्रीवादी भूमिका स्वीकारलेली असल्यामुळे गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्यातील आशयसूत्रांना वेगळेपण प्राप्त झालेले दिसते.

गौरी देशपांडयांच्या कथात्मक साहित्याच्या वैशिष्टयांचा विशेषत्वाने अभ्यास करताना प्रथम त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन आणि त्यांची विचार करण्याची पध्दती यांचा परिचय करुन घेणे आवश्यक ठरते.

कर्वे कुटुंबामध्ये गौरी देशपांडे यांचा जन्म झाला. इरावती कर्वे या त्यांच्या मातोश्री, प्राचार्य दि.धों. कर्वे हे त्यांचे वडील होत. दि.धों. कर्वे यांचा समाजशास्त्राचा तसेच अर्थशास्त्राचाही अभ्यास होता. कुटुंब नियोजनाच्या कार्याला अधिकाधिक गती मिळाली पाहिजे असा दि.धों. कर्वे यांचा आग्रह होता. इरावती कर्वे या मानववंशशास्त्रज्ञ होत्या. तसेच कथालेखन्ही

त्यांनी केले होते. त्यांची "परिपूर्ती" ही कथा विशेष गाजली. अशाप्रकारे वाङ्मयीन व वैचारिक वारसा गौरी देशपांडे यांना कुटुंबातूनच मिळालेला दिसतो. कर्वे कुटुंब महाराष्ट्रामध्ये विवेकनिष्ठ आणि तर्कशुध्द विचार करणारे सुधारणावादी कुटुंब म्हणून ओळखले जाते. महर्षि धोंडो केशव कर्व्यांपासूनच या कुटुंबाने स्त्री जीवनाचा मूलगामी विचार केलेला दिसतो आणि स्त्रीवरील अन्याय दूर करण्यासाठी क्रियाशील प्रयत्न केलेले दिसतात. महाराष्ट्रातील पहिला विधवा विवाह हा धोंडो केशव कर्व्यांनीच केला. एकंदरीत पहाता स्त्रीवरील अन्यायाचा तर्कशुध्दपणे विचार करणे आणि तो निपटून टाकण्यासाठी स्वत: कृती करणे अशी भूमिका असलेल्या कर्वे कुटुंबाची परंपरा गौरी देशपांडे यांना लाभली. स्वाभाविकपणेच स्त्रीच्या जीवनाकडे आणि अनुभवांकडे पाहण्याची एक थेट तर्कशुध्द वाट गौरी देशपांडे यांना कुटुंबाच्या परंपरेनेच खुली केली. उपजत गुण, कौटुंबिक जिव्हाळा, साहित्यिक वातावरण, इंग्रजी शिक्षण, पाश्चिमात्य ग्रंथांचा अभ्यास, जगप्रवास, तेथील स्वानुभव यांचाही त्यांच्या विचारसरणीवर परिणाम झाला. स्वाभाविकपणे त्यांची आशयसूत्रे सधन बनली.

## गौरी देशपांडे यांच्या कथात्मकलेखनातील आशयसूत्रे :

### १) पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील स्त्रीची कुचंबणा :

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील स्त्रीची जी कुचंबणा होते तिचे चित्रण हे गौरी देशपांडे यांच्या साहित्यातील प्रमुख आशयसूत्र आहे. त्यांच्या सर्वच कथा वाङ्मयामध्ये ते आढळते. उदाहरणादाखल काही कथांचा विचार करु.

"कावळ्या चिमणीची गोष्ट" [२] या कथेमध्ये लोकसाहित्यातील एका कथेचा योजकतेने वापर करुन घेऊन गौरी देशपांडे यांनी पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील कुचंबलेल्या स्त्रीचे चित्र रेखाटले आहे. कावळ्या चिमणीच्या मूळ बीजकथेत काही बदल करुन आपले आधुनिक आशयसूत्र बनविण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे.

सातवाहनाच्या काळामध्ये मातृसत्ताक पध्दती होती. त्यावेळी पुरुषाचे स्थान केवळ बीजधारणा, संतती देणे (संतानदायकत्व) एवढेच होते. या पलीकडे पुरुषाला स्थान नव्हते. याचेच दर्शन लोकसाहित्यातील "कावळ्या चिमणीच्या" कथेत घडते. या मूळ बीजकथेत याच अर्थाने कथा सांगितली गेलेली आहे. मात्र गौरी देशपांडे यांनी आशयसूत्राच्या दृष्टीने बदल करून, प्रतिकात्मक रुप देऊन आजच्या पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रींची होणारी विटंबना, कुचंबणा प्रस्तुत कथेत रेखाटली आहे. आजच्या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीचे स्थान, पुरुषाची तिच्याकडे पाहण्याची दृष्टी, पुरुषाचा मतलबीपणा, पुरुषाकडून होणारी स्त्रीची फसवणूक याचे चित्रण कावळ्या चिमणीच्या प्रतीकांतून केलेले आहे.

आपमतलबी पुरुष आपला हेतू, मतलब साध्य होताच आपली भूमिका कशी बदलतो व पुन्हा साळसूदपणे समाजात वावरतो याचे चित्रण या कथेत आहे. स्त्रीची फसवणूक होते. तिला समाजात स्थान रहात नाही. परंतु पुरुष कितीही जरी चुकीचे वागला असला तरी त्याचे समाजातील स्थान हे बळकटच राहते. मात्र स्त्रीच्या नशीबी दु:ख, कलुषीतदृष्टी, द्वेषच येतो. पुरुष सतत आपली नाती बिनदिक्कतपणे बदलत असतो. याचे चित्रण केले आहे. प्रस्तुत कथेतही कावळीला चिमण्याकडून फसविले गेले आहे. जेव्हा ती निराधार होते व आश्रयासाठी अपेक्षेने चिमण्याच्या दारात येते तेव्हा चिमणा व चिमणी आपल्या मेणाच्या घरात सुखरुप असतात. मात्र कावळीला दाद देत नाहीत. पूर्वी या कावळीचा चिमण्याने उपभोग घेतलेला आहे. पण जेव्हा ती संकटात सापडते आणि मदतीचा हात मागण्यासाठी चिमण्याच्या दारात येते तेव्हा मात्र तो तिची अजिबात कदर करीत नाही. कावळी निराश होऊन उलट्या पावली परत जाते व एका झाडाखाली आसरा घेते. कावळीची बाजू भक्कम झाल्यावर आणि चिमण्याची चिमणीशी गरज भागल्यावर

चिमणा पुन्हा कावळीकडे येतो. तिला पुन्हा आपल्या घरी येण्याविषयी विचारणा करतो. तेव्हा मात्र कावळी त्याला प्रत्युत्तर देत नाही. ती आता शहाणी झाली आहे. तिने आता स्वत:च्या हिंमतीवर जगण्याचा निर्णय घेतलेला आहे.

पुढे "पण ती दुसरीच शुक्रवारची वगैरे कहाणी आहे" (पृ.क्र.४) या एकाच वाक्याने लेखिकेने कथेला कलाटणी दिली आहे. मूळ बीजकथेतील प्रतिकांचे, घटनांचे क्रम आणि स्थान यांच्यात बदल करून लेखिकेने पितृसत्ताक समाजातील स्त्रीच्या वाटयाला येणारी कुचंबणा चित्रित केलेली आहे. मात्र हे चित्रण मनाला खोलवर भिडत नाही. आशयसूत्र सच्चे आणि प्रभावी असले तरी, एका प्रमुख अशा सामाजिक समस्येचे द्योतक असले तरी असे घडते याचे कारण म्हणजे, सामाजिक समस्या ही जर तिच्या संपूर्ण सामाजिक परिसराच्या चित्रणासह आविष्कृत झाली असेल तरच तिचे सर्वांगीण रूप प्रत्ययाला येते व ते प्रभावीही ठरते. इथे मात्र सामाजिक संदर्भ छाटून टाकून केवळ प्रतिकांद्वारे आशयसूत्र आविष्कृत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे तो व्हावा तितका प्रत्ययकारी झालेला नाही.

"ओहोटी" [3] या कथेत विवाह न करता एकत्र राहणाऱ्या सोना आणि राम यांच्या जीवनानुभवांचे चित्रण आहे. विवाह नाकारून एकत्र, समविचाराने रहात असताना राम अचानक, गुपचुप सोनाला कळू न देता दुसऱ्या एका स्त्रीशी लग्न करतो आणि याची वाच्यताही तो करीत नाही. सोनाच्या हितचिंतकांकडून तिला ही बातमी कळते. तेव्हा ती आपल्या साऱ्या संबंधाचा फेरविचार करते. आक्रस्ताळेपणा किंवा त्रागा न करता ती स्वत:ला निरनिराळ्या कामात गुंतवून घेते.

बाह्यत: आधुनिक विचाराचा म्हणविला जाणारा राम सुध्दा लग्न करतो आणि ते ही सोनाला फसवून. त्याला सोना सारखी आधुनिक

विचाराची स्त्री सहधर्मचारिणी म्हणून फार काळ आवडत नाही. या दोघांमध्ये चांगले संबंध असताना राम सोनाला फसवून अन्य एका स्त्रीशी लग्न करतो. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये आधुनिक विचारांचे पुरुष सुध्दा स्त्रीयांची कशी फसवणूक करतात याचे हे चित्रण आहे. रामने तिच्या तत्वांची अवहेलना करुन, आपल्या सोयीने अर्थ लावून घेतलेला आहे. त्याच्या लग्नाविषयी एकूण चिडून न जाता एक वेगळे कुतुहल तिच्या मनात निर्माण होते. एवढा मोठा अन्याय, दु:ख ती मुकाटपणे का सहन करते, कोणताही निर्णय का घेत नाही ? म्हणून तिची मैत्रिण चिडते पण सोना मात्र हे सर्व शांतपणे, संयमाने सहन करते. तिच्यावर झालेल्या या अन्यायाचे, तिच्यातील सोशिकपणा व सामंजस्य आणि प्रियकरावरील विश्वास, तिची त्याच्याकडून झालेली अवहेलना हे सर्व सहन करुन ती स्वत:च्या दिनचर्येत बदल करते. मात्र कोणत्याही प्रकारचा त्रागा करीत नाही. तिच्या या कुचंबणेचे चित्रण गौरी देशपांडे यांनी अत्यंत सहृदयतेने केलेले आहे.

"याचसाठी" [4] या कथेत चाळीशीनंतरअचानक दिवस गेल्याने शरमिंदा झालेल्या मधुराबाईच्या मन:स्थितीचे अत्यंत मार्मिक चित्रण केलेले आहे. जोपर्यंत स्त्रीतील स्त्रीत्व व पुरुषातील पुरुषत्व जिवंत आणि, कार्यरत असते तोपर्यंत निसर्ग नियमांप्रमाणे घडणाऱ्या घटना हया घडतच राहणार. पारंपरिकते-नुसार आपल्या संस्कृतीत ठरावीत घटना ठराविक वयातच घडल्या पाहिजेत. जर त्यांचा क्रम बदलला तर ते अनिष्ठ, पाप आणि लज्जास्पद मानले जाते. हे सर्व स्त्रीच्या वाट्यालाच वाढून ठेवलेले असते. तेव्हा तिलाच या साऱ्यांना बळी जावे लागते.

"याचसाठी" या कथेची नायिका मधुराबाई चाळीशी ओलांडलेली स्त्री आहे. त्यांची मुले आता बरोबरीला आलेली आहेत आणि मधुराबाईना आता दिवस गेलेले आहेत. याचा परिणाम म्हणून कौटुंबिक वातावरण

विस्कळीत झालेले आहे. त्यांची स्वत:ची मन:स्थिती पुर्णपणे विकलीत झालेली आहे. त्यांना कुणाला तोंड दाखविण्याची इच्छा होत नाही. त्यांना एखाद्या गुन्हेगारासारखे वाटते आहे. त्यांच्या या मन:स्थितीचे नेमके चित्रण लेखिकेने केले आहे. यातून सुटका म्हणजे मृत्यू.

आजच्या पुरुषप्रधान समाजात प्रत्येक घटनेला, गोष्टीला स्त्रीच कशी जबाबदार धरली जाते. निसर्गाने स्त्रीला बहाल केलेली वैशिष्टये तिच्यात असणारच. परंतु पुरुषाने आपल्या वर्चस्वासाठी, अहंकार कुरवाळण्यासाठी जी कृत्रिम बंधने तिच्यावर लादली आहेत त्यामुळे स्त्रीची कुचंबणा होते. तिला आगतिक आणि लांच्छनास्पद जीवन जगावे लागते आणि मरणावाचून त्यातून तिची सुटका होत नाही. हे मधुराबाईंच्या चित्रणातून स्पष्ट होते. त्या गर्भवती राहिल्या म्हणजे निसर्गापेक्षा ते कांही फारसे वेगळे घडले असे नाही. परंतु आपल्या समाजामध्ये विवाह केंव्हा करायचा मुले केव्हा व्हायची या बद्दलच्या समजुती इतक्या ताठर असतात की, चाळीशी नंतर गर्भवती झालेली स्त्री ही समाजाच्या टीकेचा विषय ठरते. मनातून ती-ही शरमिंदी होते. हा कुचंबलेपणा या कथेत नेमकेपणाने चित्रित केलेला आहे.

"राईट ऑन सिस्टर" [5] या कथेतील सिंधू मध्यमवर्गीय कुटुंबातील, बी.ए. पर्यंत शिकलेली, एकटीच संसार थाटू इच्छिणारी, परंतु वडिलांच्या आग्रहास्तव, इच्छेखातर व समाजरीतीनुसार लग्न करणे तिला भाग पडते. लग्नानंतर ती तीन मुलींना जन्म देते. वंशासाठी नवरा, सासू-सासरे, नणंद या सा-यांना मुलगा हवा असतो. मुली होणे हा कांही तिचा दोष नसतो. परंतु पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये ही सर्व दुषणे स्त्रीच्याच माथी मारली जातात. सिंधुचा दीर "मध्या" (मधुकर) जेव्हा अमेरिकेहून येतो व तेथील समाजव्यवस्था, स्त्री स्वातंत्र्याविषयी सांगू लागतो तेव्हा सिंधूच्या मनात जी भावना दडलेली असते, तिचे हे कोंडलेले मन एका वेगळया भावविश्वात तरळू लागते तिलाही

तशा प्रकारचे स्वातंत्र्य हवेहवेसे वाटू लागते. तिचे मन पेटून उठते, तिला वाटते सर्व बायकांनी मिळून एक कॉलनी तयार करावी, पुरुषाचा प्रत्येक कामासाठी चार्ज (मोल) घ्यावे. पण ही कल्पना मनातल्या मनातच लुप्त होते. हे तिचे स्वप्न क्षणार्धात विरुन जाते. कारण पारंपरिकतेने बाईचे विश्व हे चार भिंतीच्या आतचे असते. तिने चुलीपुढून माजघरात नि माजघरातून शेजघरात इथपर्यंतच पोहोचावे. जास्त अक्कल चालवू नये. तिने नोकरी करु नये. नको तिथं नाक खुपसू नये. कारण शेवटी बाया त्या बायाच. हीच धारणा असलेल्या पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीची कशी कुचंबणा होते याचे अत्यंत सुंदर चित्र गौरीबाईंनी या कथेत रेखाटले आहे.

हरीभाऊंच्या कादंबरीतही समाजातील स्त्रीची कुचंबणा हे आशयसूत्र आढळून येते. परंतु पुरुषाने त्याच्या भुमिकेतून दूरस्थपणे स्त्रीचे केलेले चित्रण आणि स्त्रीनेच स्त्रीचे रेखाटलेले चित्र यामध्ये मूलभूत फरक दिसून येतो. या फरकाचे दर्शन गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्यातून चित्रित होणारी स्त्रीची कुचंबणा आणि पुरुषांच्या साहित्यातून चित्रित झालेली स्त्रीची कुचंबणा यांच्या तुलनेतून घडू शकते.

विभावरी शिरुरकरांच्या कथात्म वाड्.मयातही स्त्रीच्या कुचंबणेचे आशयसूत्र आढळते. परंतु त्यांच्या कथात्म वाड्.मयामध्ये या कुचंबणेच्या चित्रणालाच प्राधान्य आहे. हे चित्रण भावनात्मक अंगाने अधिक झाले आहे. मात्र गौरी देशपांडे यांच्या कथात्मक वाड्मयामध्ये कुचंबलेल्या स्त्री जीवनाचे चित्रण अनुषंगिक म्हणून येते. बंडखोर स्त्रीच्या अनुभव चित्रणाला उठावदारपणा प्राप्त व्हावा, अथवा पार्श्वभूमीदाखल हे चित्रण येते. ही कुचंबणा भावनिक हळवेपणाच्या पातळीवर जाणार नाही. याची काळजी गौरीबाई घेतात.

विभावरी बाईंच्या "त्याग" व "बाबांचा संसार माझा कसा होईल ?"[7] या दोन्ही कथांमध्ये प्रौढ कुमारिकेच्या कुचंबणेचे चित्रण केले आहे. कमावत्या

मुलीकडे अर्थोत्पादनाचे एक उत्कृष्ट साधन म्हणून पाहिले जाई. तेव्हा तिच्या नैसर्गिक भावनांचा विचार केला जात नसे. तिने कमावून आपले आईवडिल, भावंडे यांचा सांभाळ करावा. हे करीत असताना लग्नाचे वय ओलांडून प्रौढत्व येवू लागले तरी तिच्यावर कुटुंब सांभाळण्याची जबाबदारी असल्याने तिच्या मनाला तिला मुरड घालावी लागे व आपले कर्तव्यच पार पाडावे लागे. तेव्हा तिच्या मनातील नैसर्गिक भावनांचा तिला अपरिहार्यपणे त्यागच करावा लागे. भावनिक मनाचा कोंडमारा होणाऱ्या अशा प्रौढ कुमारिकेच्या कुचंबणेचे चित्रण विभावरीबाईंनी अत्यंत अलवारपणे भावनिक पातळीवर रेखाटलेले आहे. पण गौरीबाई मात्र असे चित्रण करीत असताना ते भावनिक पातळीवर न करता अत्यंत अलिप्तपणे व तटस्थपणे करतात.

२) <u>स्वतंत्र व्यक्तित्वासाठी संघर्ष/मुक्त होण्याची आकांक्षा :</u>

मराठी कथांतून भेटणाऱ्या स्त्रियांपेक्षा अगदी वेगळ्या स्वभावाची आधुनिक मनाची स्त्री गौरी देशपांड्यांच्या कथांत भेटते. ती स्वयंभू मुक्त आहे. तिने स्वतःला मुद्दामहून कोणात्यातरी जोखडातून मुक्त करून घेतलेले नाही. मुक्तपणा हीच तिची सहजस्थिती आहे. तिची स्वतःवर निष्ठा आहे. माझ्या मनाला जे वाटले ते मी करणार हा तिचा बाणा आहे., तिच्या जगण्याचे सूत्र आहे. तिच्या इच्छा, आकांक्षा, सहजप्रेरणा, लालसा, भावना प्रमाण मानून ती जगते. त्याबद्दल तिला अहंकार नाही आणि अपराधीपणाही नाही.

व्यक्तिस्वातंत्र्य हे मूल्य मानणाऱ्या स्त्रीच्या मनावर, नीती-अनीतीच्या पारंपरिक कल्पना, नैतिक संघर्ष, समाजभय, समाजनियमांचा भंग, कुटुंबपध्दतीची आचारसंहिता या कशाचेही ओझे नाही. तिला स्वतःचेही भय नाही. कारण ती स्वतःला स्वतःपासून लपवत नाही. उलट स्वतःच्या लालसा, वासना,

शरीर संवेदना, आसक्ती यांना ती "आहे हे असं आहे" अशा प्रांजळपणे स्वीकारते. स्वत:च्या भावनांशी, संवेदनाशी प्रामाणिक राहण्यातच तिची निष्ठा आहे. ती बुध्दिमान आहे, उदार आहे, तर्कशुध्द विचार करणारी आहे आणि प्रेमाचे मूल्य जाणणारी आहे. साहजिकच वर्तमान समाजामध्ये वावरत असताना तिला झगडावे लागते. हे झगडणे स्वतंत्र व्यक्तित्वासाठी असते. मुक्त होण्यासाठीचे असते. म्हणून स्वतंत्र व्यक्तित्वासाठीचा संघर्ष आणि मुक्त होण्याची आकांक्षा हे आशयसूत्र गौरी देशपांडे यांच्या कथांत आढळते. पार्श्वभूमीवर स्त्रीच्या कुचंबणेचे चित्रण करून पुढे या संघर्षाचे चित्रण केल्यामुळे या चित्रणाला उठावदारपणा येतो.

त्यामुळेच त्यांची नायिका स्वतंत्र व्यक्तित्वासाठी झगडा, संघर्ष किती सबळपणे देते आहे हे त्यांच्या कथांतून दिसते.

"एकेक पान गळावया"[6] या दीर्घकथेने मुलांची आईकडे"आई" म्हणून पाहण्याची दृष्टी आणि तिची स्वत:कडे व्यक्ती म्हणून पाहण्याची दृष्टी यातील संघर्ष व्यक्त होतो. कथेची नायिका राधा ही स्वतंत्र व तर्कशुध्द विचार करणारी स्त्री आहे. तिच्या पतीच्या माधवच्या मृत्यूनंतरही ती न डगमगता पटपट निर्णय घेते. तिचे जीवन पतीवर किंवा मुलांवर अवलंबून नाही. हे जगणे तिचे स्वत:चे आहे आणि म्हणून ती ते आपल्या परीने, आपले मन मानले तसे जगण्याचा प्रयत्न करते. आपल्याला कोण काय म्हणेल, लोक काय म्हणतील मुलं काय म्हणतील याकडे अजिबात ती लक्ष देत नाही. किंवा कोणताही शोक करीत बसत नाही. पतीच्या मृत्यूनंतर त्याचे मृतशरीर हॉस्पिटलला देते. मृत्यूही एक अपरिहार्य घटना आहे आणि ती कधीही कुणालाही चुकणारी नाही. त्यामुळे त्याचे इतके अवडम्बर माजवत बसणे हे तिला पटत नाही. उलट ती आपल्या जीवनाला एक वेगळे वळण

देते आणि आपल्या उत्तर आयुष्यातही ती मुलांवर अजिबात अवलंबून न राहाता ती एकटी आपले मुक्त जीवन जगू लागते.

जुन्या समाजाने लादलेली नीतीमुल्ये की जी आईने मुलांसाठी सर्वस्वाचा त्याग करावा, पत्नी म्हणून समाजाने जी भूमिका तिच्यावर लादलेली आहे त्या भूमिकेचे तिने काटेकोरपणे पालन करावे. त्यासाठी तिने आपले सर्वस्व वाहुन द्यावे ही जुनी नीतीमूल्ये राधाला मान्य नाहीत व बंडखोर समाजवाद्यांनी प्रस्थापित केलेली नीतीमूल्ये म्हणजे,"स्त्री विधवा झाल्यावर तिने पुनर्विवाह करावा" ही तिला मान्य नाही. तर ती या सर्वापेक्षा वेगळे जगणे जगू पाहते. ती "स्व"ला जपणारी आहे. ती मुक्त असतानाही तिचा भूतकालीन प्रियकर जो अजूनही तिच्या आठवणीत अविवाहितच आहे व ती विधवा झालेली आहे व वयाची पन्नाशीही गाठलेली आहे तरीही तो तिला विवाहाची मागणी घालतो पण ती त्याच्याशी विवाह न करता मैत्रिचेच संबंध ठेवते व स्वतंत्र, मुक्त जीवन जगू पाहते. इथे जुन्या नीतीमूल्यांचे संकेत आणि नव्या सुधारणा-वादी नीतीधाऱ्यांचे संकेत हे दोन्ही प्रकारचे संकेत बाजूला करुन स्वत:चा जीवन-मार्ग स्वत:च घडवित राहणाऱ्या राधेच्या संघर्षाचे चित्रण आहे.

सामाजिक जीवनाचे आणि संस्थांचे रुप कथात्म साहित्यामध्ये अपरिहार्यपणे उमटत असते. गौरीबाईंच्या साहित्यातही त्याचा पुरेपुर प्रत्यय येतो. राधा सारख्या मुक्त जीवन जगणाऱ्या आणि तर्कशुध्द विचारसरणी असणाऱ्या स्त्रीचे चित्रण गौरी देशपांड्यांनी केले आहे.

आपले सगळेच जीवन हे सवयीने बांधलेले असते. सवयीतून मुक्त होण्याची धडपड "सवय"[१] या कथेची नायिका करते आहे. ही स्त्री 'स्व'ला जपणारी व मुक्त विचार करणारी आहे. ती सर्व व्यवहार जाणते व निर्भीडपणे वावरताना दिसते. तिच्या दृष्टीने समाजाला अथवा समाजातील व्यक्तींना

फारसे महत्व नाही. ती अत्यंत स्पष्टवक्ती आहे. इतरांच्या मतांवर आपले कांही अवलंबून आहे असे तिला वाटत नाही. ती मुक्त जीवन जगणारी आहे.

मानवी जीवनात सवयीला फार महत्व दिले जाते. प्रत्येक बारीक-सारीक गोष्टींची सवय माणसाला होत असते. हळूहळू जणू काही तो सवयीचा गुलामच बनून जातो. प्रसंगपरत्वे आपोआपच तो सवयीनुसार कृती करू लागतो. तो सवयीच्या आहारी जातो व त्यामुळे त्याचं जगणं साचेबंद होऊन जात.

"सवय" या कथेची नायिका एका दुष्ट व मूर्ख माणसावर प्रेम करण्याच्या सवयीत सापडते. त्या दोघांना या गोष्टीची इतकी सवय झालेली होती की, त्यांना एकमेकांविना जीव नकोसा झाला होता. पण त्या माणसाने दुस-या बाईशी लग्न केले. या कटु अनुभवानंतर तिने सवयीची धास्तीच घेतली. त्या दोघांमध्ये नुसताच प्रेमभाव निर्माण झालेला नव्हता तर ती त्याच्या सवयीची गुलाम झालेली होती.

प्रेमासारखा अनुभव सुध्दा सवयीनेच घेतला जातो. इतके आपण सवयीचे गुलाम झालेलो असतो. या कथेच्या नायिकेने जणू याचा धसकाच घेतलेला आहे व त्याचा साईड इफेक्ट तिच्या संपूर्ण प्रकृतीवर झाला. तिचे मानसिक संतुलन बिघडले. तिला फक्त वेडयांच्या इस्पितळात पोहोचवणेच बाकी राहिले. शेवटी कंटाळून बिचारा नवराही निघून जातो. मात्र मुलांच्या संगोपनाची तिला पूर्णपणे जाण आहे. त्यामुळे ती त्या प्रसंगातून सावरते व जगरहाटी प्रमाणे दिनक्रम चालू ठेवते. पुन्हा एकदा एक पुरूष तिच्या आयुष्यात येऊ पहातो. त्याच्या मनात हिच्याविषयी प्रेमाचा ओलावा निर्माण झालेला आहे. पण ही एकदा अशा कटू अनुभवातून, प्रसंगातून होरपळून निघालेली आहे व तेंव्हापासून ती अत्यंत सावधगीरीने निर्णय घेते आहे, जगते आहे. पुन्हा असा कटू अनुभव येऊ नये किंवा अशी सवय जडू नये याची खबरदारी घेते. कांही प्रसंगी

तिला त्याच्याबद्दल कुतुहल वाटते, त्याची कीव येते. परंतु तिने सवयीची धास्तीच घेतलेली असल्यामुळे ती वेळीच सावरते. सवयीतून मुक्त होण्यासाठीची धडपड, सवयीशिवाय जगण्यासाठी, स्वतंत्र जीवन जगण्याची धडपड करताना नायिकेच्या द्विधा मन:स्थितीचे चित्रण अगदी नेमकेपणाने लेखिकेने केलेले आहे.

शेवटी या सवयीच्या बंधनात अडकून न पडता मुक्त जीवन जगण्यासाठी प्रथम सवयी झाडून दिल्या पाहिजेत असे ती ठरवते व वागते. प्रेमभंगापेक्षा सवयीच्या कचाटयातून मुक्त होण्याची धडपड या कथेत आहे.

"कावळ्या चिमणीची गोष्ट" [१०] या कथेत चिमण्याकडून फसविल्या गेलेल्या कावळीच्या स्वतंत्र जीवन जगण्याच्या धडपडीचा संघर्ष गौरी देशपांडयांनी कावळ्या चिमणीच्या प्रतिकाद्वारे चित्रित केलेला आहे. कावळ्या चिमणीच्या कथेतील पक्षीजगात घडणाऱ्या घटनांचे व्यक्तीजीवनाशी संबंध जोडून पुरुष-प्रधान संस्कृतीत स्त्रीचे स्थान, तिची पुरुषवर्गाकडून होणारी फसवणूक हे कावळी-च्या प्रतिकातून मांडलेले आहे.

धो धो कोसळणाऱ्या पावसामुळे कावळीचे असलेले शेणाचे घर वाहून जाते, तेव्हा ज्या चिमण्याने तिचा उपभोग घेतलेला आहे, त्याचे घर मेणाचे असल्यामुळे शाबूत आहे. आपल्याला या कठीण प्रसंगी तो आसरा देईल या अपेक्षेने आपल्या पिलांना घेऊन कावळी चिमण्याकडे येते. चिमणा व त्याची चिमणी घरटयात असतात परंतु दार उघडत नाहीत. कावळी अत्यंत लाचार, घाबरलेली, काकुळतीला आलेली आहे. परंतु तेथून ती निराश होऊन आल्या पावली उलटी परत जाते व एका झाडाखाली आसरा घेते. पुढे चिमणीशी गरज भागल्यावर तो पुन्हा कावळीकडे येऊन आपल्या घरी येण्याविषयी विचारणा करतो. तेव्हा ती अजिबात उत्तर न देता गप्प राहते. आपल्या पायावर समर्थपणे उभी राहून आपले सामर्थ्य दाखवून देते.

पुरुष हा किती मतलबी व ढोंगी असतो. बिचाऱ्या गरीब अबलांना तो कसा सोयीस्करपणे फसवितो. याचे चित्र या प्रतिकात्मक कथेतून रेखाटले आहे. याच कथेत शेवटी "पण ती दुसरीच शुक्रवारची वगैरे कहाणी आहे." (पृ.क्र.४) या एका वाक्याने कलाटणी देऊन, आजच्या बदलत्या युगात स्त्री ही आता तितकी असमर्थ, भोळी राहिलेली नाही. ती पुरुषाच्या मोह-जालात फारशी न फसता त्याचा कटू अनुभव आल्यास त्याची पुनरावृत्ती न करता ती आपल्या सामर्थ्यावर आपले जीवन स्वाभीमानाने जगू शकते. याचे चित्रण केले आहे. शुक्रवारच्या कहाणीचा संदर्भ तेवढयाच साठी येतो. आजची आधुनिक स्त्री ही आता फक्त पुरुषाच्या आधारावरच अवलंबून नाही. ती स्वतंत्र आहे. स्वत:चे आयुष्य स्वत:च्या सामर्थ्यावर चांगल्याप्रकारे जगता येईल इतपत ती सर्वच बाजूंनी समर्थ ठरली आहे. त्यासाठी तिला प्रचलित समाजात कसकसा संघर्ष करावा लागतो याचे प्रतिकात्मक चित्रण गौरी - देशपांडयांनी केले आहे.

"चंद्रिके ग सारिके ग" [११] या कथेची नायिका "सुहास" ही उच्चभ्रू सुशिक्षित आहे. अर्थशास्त्र आणि व्यवस्थापन या दोन्ही विषयाच्या पदव्या प्राप्त करून पीएच्.डी.साठी अमेरिकेला जाऊन ती उच्च पदवी (डिग्री) मिळविलेली आणि जन्मल्या क्षणापासूनच जिच्या वाटयाला प्रेमाखेरीज कांही आलेच नाही अशी समर्थ नायिका. परंतु तिने लग्नाची बेडी घालून घेतली नाही. तिला लग्न करणे अजिबात अवघड नव्हते. पण तिने लग्न न करण्याचा ठाम निश्चय केलेला आहे. पुरुषाकडे ती वेगळया दृष्टिकोनातून पाहते. ती म्हणते, "नवरा म्हणून कुणीतरी पुरुष लागतोच का आयुष्यात ? इतर बरेच पुरुष आहेत की मला ! भाऊ वडील मित्र सुध्दा !" (पृष्ठ क्र.१३५) यावरुन तिचे अनुभवाकडे वेगळया दृष्टीने पाहण्याच्या वृत्तीचा प्रत्यय येतो. स्वत:चे सामर्थ्य, विश्वास दिसून येतो. पण अमेरिकेत ती "मिचेल"नावाच्या सुस्वभावी, हुशार व उच्चशिक्षित, संख्याशास्त्रात डॉक्टरेट मिळविलेल्या

पुरुषाच्या सानिध्यात येते. प्रेमाचा फुलोरा बहरतो. प्रेमाचा हा वृक्ष फुलत असतानाच ती सर्व सोडून, मिचेलला सोडून परत येते. आप्तस्वकीयांबद्दलची ओढ आणि प्रियकराबद्दलची ओढ यामध्ये निर्माण झालेल्या तिच्या मानसिक संघर्षाचे चित्रण अचुक शब्दात टिपले आहे.

ती स्वतंत्र व तर्कशुध्द विचार करणारी आहे. तिला कोणत्याही पुरुषाच्या आधारे जगायचे नाही. मिचेलशी आलेल्या प्रेमसंबंधांना झुगारुन जेव्हा ती परत येते त्यावेळच्या तिच्या मन:स्थितीचे चित्रण अत्यंत अलवार भावनेने लेखिकेने केलेले आहे.

सुहास वस्तीवर आई-बाबांसह रहायला लागते तेव्हा योगायोगाने कारखान्याचे एम्.डी. "समरेंद्र पॉल" यांच्याशी ओळख होते, मैत्री होते, नकळतच त्यांच्यामध्ये आकर्षण निर्माण होते. परंतु प्रत्येक वेळी सुहास अत्यंत विचारपूर्वक पाऊल उचलताना दिसते, अत्यंत निर्भयपणे निर्णय घेते. या सर्व बाबतीत तिची तर्कशुध्दता, 'स्व'ला जपण्याची व मुक्त जीवन जगण्याची आकांक्षा, धडपड दिसते. सुहासला मानवी नातेसंबंधाची जाणीव आहे. ती स्वत:ला विवाह बंधनात बंदिस्त करु इच्छित नाही. तर्कशुध्द विचारांनी 'स्व'ला जपता जपता मुक्तजीवन जगणा-या व मानवी नातेसंबंधाची जाण असणा-या या दृढनिश्चयी स्त्रीचे चित्रण गौरी देशपांडे यांनी अतिशय मार्मिकपणे, परिणामकारक केले आहे.

३) विवाह संस्थेचे रूप :

प्राचीन कालापासून समाजव्यवस्थेमध्ये विवाह संस्थेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. या विवाह संस्थेचे रूप कालानुसार, परिस्थितीनुसार बदलत राहिलेले दिसते. जसजसा मानव प्रगतशील बनत गेला तसतसा त्याच्या आचार विचारातही बदल होत चालला. रूढी परंपरातही बदल होत गेला. साहजिकच

विवाह विषयीच्याही त्याच्या संकल्पना, विचार बदलत गेले. आजच्या भारतीय समाजातील विवाह संस्थेचे आधुनिक रूप प्राचीन काळातील विवाह संस्थेच्या रूपापेक्षा फारच बदललेला आहे. याचे प्रत्यंतर वि.का. राजवाडे यांच्या "विवाहसंस्थेचा इतिहास" या पुस्तकाच्या वाचनाने येऊ शकते.

सामाजिक जीवनाचे आणि संस्थांचे रूप कथात्म साहित्यामध्ये अपरिहार्य-पणे उमटत असते. गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्यातही याचा पुरेपूर प्रत्यय येतो. दुस-या महायुध्दानंतर जागरूक स्त्रीचा लग्नसंस्थेकडे पाहण्याचा दृष्टीकोन पूर्णपणे वेगळा झाला. पूर्वीच्या स्त्रीवर ब-याच मर्यादा होत्या. "चूल आणि मूल" हे तिचे विश्व होते. परंतु बदलत्या कालानुसार, परिस्थिती-च्या रेट्यानुसार स्त्री वरील ही बंधने सैल होत गेली आणि दुस-या महायुध्दा-नंतर संपूर्ण परिस्थितीचा कायापालटच झाला. स्त्रीवादी चळवळीची सुरुवात झाली आणि स्त्रीला व्यक्ती, माणूस म्हणून जगण्यासाठी तिने संघर्ष सुरु केला. ती शिक्षणाच्या,नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडली आणि तिचा पुरुष वर्गाशी संबंध येऊ लागला. तिची जीवन जगण्याची पध्दती, तिची नीतीमूल्ये, जीवनमूल्ये बदलू लागली. पारंपरिक मूल्यांना झुगारून देऊन नवीन मूल्ये प्रस्थापित होऊ लागली. त्यामुळे बदलत गेलेल्या, बदलत जाणा-या विवाह संस्थेच्या रूपाचे चित्रण असे एक आशयसूत्र गौरी देशपांडयांच्या कथांत आढळते.

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये विवाह संस्थेसारखी संस्था स्त्रीच्या पायात पारतंत्र्याची बेडी कशी घालते ? आणि तिच्या सामाजिक व मानसिक भावनांना बंधने कशी घालते व या विवाह संस्थेत तिची कुचंबणा कशी होते याचे चित्रण तर गौरी देशपांडे यांनी केले आहेच. परंतु नव्या विचाराने प्रेरित झालेली स्त्री या विवाह संस्थेला आव्हान कशी देते याचेही चित्रण गौरी देशपांड्यांनी केले आहे. म्हणून विवाह संस्थेचे प्राचीन रूप आणि भविष्यकालीन रूपाचे वेध घेणारे रूपही त्यांच्या कथांतून दिसून येते. या बदलत्या विवाह संस्थेचे रूप

चित्रित करणे हे त्यांच्या कथात्म लेखनाचे महत्वाचे आशयसूत्र असल्याचे दिसून येते.

"ओहोटी"[१२] या कथेची नायिका सोना व राम हे दोघे आधुनिक विचाराचे आहेत. ते दोघे लग्न न करता एकत्र रहात असतात. या नायिकेला परंपरागत लग्नाची रूढी मान्य नाही. तिने ती पूर्णपणे झुगारून दिली आहे. उलट लग्न हा व्यवहार आहे असे ती मानते. या व्यवहारापेक्षा प्रेमभावना श्रेष्ठ आहे असे तिचे ठाम मत आहे. ती सुशिक्षित, नोकरी करणारी, तर्कशुध्द विचारसरणी लाभलेली व निर्भीड वृत्तीची आहे. ती समाजाचा, समाजातील व्यक्तींचा विचार करीत नाही. ती प्रेमभावनेला प्राधान्य देते व स्वत:चे निर्णय स्वत: खंबीरपणे घेते. या तिच्या धाडसापोटीच ती रामशी लग्न न करता रहाते. परंतु या पुरुषप्रधान संस्कृतीतील पुरुष राम परंपरागत रूढी-परंपरांना कुरवाळतो. आपमतलबी वृत्तीचा हा पुरुष तिच्या भावनेशी खेळतो व गुपचुप दुस-या स्त्रीशी लग्न करून सोनाची एकप्रकारे अवहेलनाच करतो.

सोना व राम यांच्या मध्ये प्रेमभाव आहे. त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा लिखित स्वरूपाचा करार झालेला नाही. फक्त राम व तिचे प्रांजळ प्रेम व विश्वास आहे. मात्र राम हा अत्यंत संकुचित विचाराचा, परंपरागत रूढी-परंपरांना मानणारा, जोपासणारा आहे. त्याला सोनासारखी तर्कशुध्द विचार करणारी व सामर्थ्यशाली स्त्री फार काळ सहचारिणी म्हणून आवडत नाही. तो तिला न सांगता "निर्मला संघवी" नावाच्या ऐतखाऊ व परपुष्ट अशा स्त्रीशी लग्न करतो. त्याच्या मते, "लग्नाची बायको घेऊन समाजात वावरता येते. मात्र प्रेमाची बायको घेऊन समाजात वावरता येत नाही." या संकुचित विचाराने तो सोनाला कल्पनाही न देता लग्न करतो. सोनाला त्याच्या लग्नावर आक्षेप नाही. उलट ती म्हणते, मला जर त्याने लग्नाविषयी

विचारले असते तरी मी नाहीच म्हंटले असते. "केवळ लग्नाची बेडी घातली म्हणजेच ख-या अर्थाने पती-पत्नी झालोत हे तुटपुंजे विचार तिला मान्य नाहीत. मात्र परक्यांकडून, म्हणजे तिच्या मैत्रिणीकडून तिला हे कळते तेव्हा तिला थोडे आश्चर्य, कुतुहल वाटते. ती विचार करते ते आपल्या अपेक्षा, रामच्या या वर्तनामागची कारणांचा. स्त्री पुरूषांच्या एकमेकांवरील मालकीचा मुद्दा जरी इथे नसला तरी राम हा "लग्न" या गोष्टीला महत्व देतो आहेच. समाजाला अनुकूल संबंधही ठेवायचे आणि प्रेमाचे संबंधही ठेवायचे असे रामचे वर्तन आहे. मात्र सोना प्रियकर आपल्या हातातून निसटून जात असतानाही आक्रस्ताळे-पणा वा त्रागा करीत नाही. स्वत:ला निरनिराळया कामात गुंतवून घेते. अत्यंत अलिप्तपणे प्रियकराच्या दुराव्याचे विश्लेषण करते. ती ते स्वत:च्या इच्छेसारखेच समजून घेते.

लग्न हा व्यवहार आणि प्रेम ही भावना मानणा-या आधुनिक स्त्री पुरूषाच्या दृष्टीने नैतिकतेचा अर्थ लैंगिक व्यवहारातील समाजमान्यता पाळणे असा केला जातो. लैंगिक व्यवहाराचा संबंध नीतीमत्तेशी जोडला गेल्यामुळे या लैंगिक संबंधाची प्रतिष्ठा "लग्न" या समाजमान्य संस्थेत होते. स्वतंत्र व आधुनिक विचारांच्या स्त्री पुरूषांच्या मनातही समाजाने रूजवलेली ही तत्वे कुठेतरी चिकटून असतात आणि त्यातून या नव्या आधुनिक विचारांशी पुरेसे, पुर्णपणे जुळवून घेता येत नाही. अशी ही गुंतागुंत आहे. मात्र "ओहोटी" ची नायिका सोना ही नव्या विचाराने प्रेरित झालेली आहे. ती परंपरागत विवाहाचे रूप झुगारून देऊन, प्रेमाला प्राधान्य देऊन तिने विवाह संस्थेला एक आव्हानच दिले आहे. एवढेच नव्हे तर विवाहसंस्थेचे एक वेगळेच रूप दाखवून दिले आहे.

"मुक्काम" [१३] या कादंबरीची नायिका 'कालिंदी' बौध्दिकदृष्टया विकसित झालेली आहे. ती विचाराने स्वतंत्र आहे. ती जीवनाचा प्रगल्भपणे विचार करते व आपल्या मनाच्या वाटेने जात असते. ती नंदनशी विवाहबध्द

होते खरी, परंतु हा विवाह मात्र सफल झालेला नाही. तिचे आपल्या पतीवर प्रेम होते. परंतु तो तिची फारशी कदर करीत नाही. एका मतीमंद मुलीला जन्म देताच या दोघांमधील अंतर, दरी वाढत जाते. ते दोघे एकमेकांपासून विभक्त होतात.

लग्नसंस्थेविषयीचे नायिकेचे विचार अत्यंत बोलके आहेत. ती म्हणते, "लग्न म्हणजे जगन्मान्य रीतीने शरीराच्या गरजा पुरवण्याचा एक मार्ग. त्यातून पुढे नवरा-बायकोंना एकमेकांबद्दल कांही प्रेम वाटायला लागले तर ठीक, नाहीतर रूढीप्रमाणे एकत्र आयुष्य ढकलायचे असतेच की." (पृ.क्र.१०४) मात्र ही नायिका या परंपरागत विवाह रूढीला फाटा देऊन,जेव्हा तिचे व तिच्या नव-याचे खटकले, जेव्हा तिची त्याला गरज नाही याची तिला ठाम खात्री झाली तेव्हा ती त्याच्यापासून विभक्त होते. ही नायिका सुशिक्षित, तर्कशुध्द विचार करणारी आहे, निर्भिड आहे. ती समाजाचा, इतर व्यक्तींचा विचार करीत नाही. तर आपले जीवन आपल्या परीने, आपल्या मनाला भावेल त्या पध्दतीने ती जगते. तिचे दिमित्रीशी प्रेमसंबंध येतात. यांच्यातील ही प्रेमभावना अत्यंत निखळ, प्रांजळ आहे. अंत:करणापासून ती एकमेकांवर प्रेम करतात. दिमित्री हा विवाहित आहे. मात्र त्याचा व त्याची पत्नी अंगोलिकी यांचाही घटस्फोट झालेला आहे. दिमित्रीला फार मोठा अपघात होतो व महत्प्रयासाने तो त्यातून वाचतो. बरा होतो. "ग्रीस"मधील "किआ" या गावी पुन्हा आपले स्वतंत्र घर बांधतो. तो कालिंदीच्या आठवणीतच जगत असतो. इकडे कालिंदी नंदनशी विभक्त होऊन तळेगावला एका अपंग पुनर्वसन केंद्रात नोकरी करून स्वत:च्या पायावर स्वत: उभी राहते. इयन हा तिचा मित्र तिला भेटण्यास येऊन दिमित्रीचा पत्ता सांगतो तेव्हा ती पुन:त्याच्याकडे ग्रीसला जाते. अपघातामध्ये आपले बरेच अवयव गमावून बसलेल्या प्रियकराला पाहून तिला अत्यंत वाईट वाटते. मात्र तिचे त्याच्यावरील प्रेम अजिबात कमी होत नाही. तर उलट तिला त्याची

कीवच येते. दिमित्री आणि कालिंदी दोघेही विवाहित आहेत. परंतु या सामाजिक परंपरेने बांधिल झालेल्या या दोन्ही व्यक्ती आपापल्या वैवाहिक जीवनात दुखावलेल्या आहेत. अंगोलिकीला दिमित्रीची कदर नाही, तर नंदनला कालिंदीची. परंतु पाश्चिमात्य संस्कृतीत घटस्फोट ही घटना अगदी जुजबी मानली जाते. तेंव्हा अंगोलिकी आणि दिमित्र यांचा घटस्फोट होतो. मात्र कालिंदी आणि नंदन हे विभक्त राहतात. नंदनला आपली धर्मपत्नी कालिंदीची अजिबात गरज नाही. परंतु कालिंदी मात्र प्रत्येक प्रसंगाला अत्यंत सोशिकतेने तोंड देते व निर्भयपणे स्वत:च्या हिंमतीवर जीवन जगण्याची धडपड करते. ती नंदनची समाजमान्य पत्नी असुनही विवाहित पुरुषाशी विवाहबाह्य संबंध ठेवते. इथे शारीरिक भूक, आकर्षण या गोष्टींना फारसे महत्व नसून मानसिक पातळी व एकमेकांना समजून घेऊन, एकमेकांच्या दु:खात सहभागी होऊन ते दु:ख वाटून घेण्याची जी तळमळ आहे, जी एकमेकांविषयींची आंतरिक ओढ आहे त्या ओढी-तील पावित्र्य, आत्मविश्वास व यातून त्यांच्यात निर्माण झालेले हे नाते सामाजिक रुढी-परंपरांना धक्का देणारे असले तरी नायिकेला याची अजिबात चिंता नाही. तिने नंदनशी विवाह केला असला तरी या नात्यात ती अजिबात सुखी नाही. ती अत्यंत सोशिकतेने हे नाते टिकविण्याचा प्रयत्न करते पण नंदनला तिची अजिबात कदर नाही हे उमजल्यावर ती अत्यंत तर्कशुध्द विचार करून विभक्त होऊन तळेगावला नोकरी करते. आपल्या प्रियकराला भेटण्यास ग्रीसला जाते. तो देखिल आता घटस्फोटित आहे व केवळ कालिंदीच्या आठवणीवर तो जिवघेणा अपघात, घटस्फोट या सारख्या तिव्र फटक्यातूनही वाचतो व कालिंदीशी वैवाहिक संबंध प्रस्थापित करण्याची त्याची अभिलाषा असते. परंतु कालिंदी पुन: मायदेशी परत येते, नोकरीत रूजू होते व आपले जीवन जगू लागते. सामाजिक रुढी परंपरेनुसार असलेले विवाह संस्थेचे एक आगळे रूप तर आहेच पण त्याच बरोबर जर हा विवाह असफल झाला तर स्त्रीला कसकशा समर प्रसंगांना तोंड द्यावे लागते व तिची कशी ओढाताण होते याचे सुंदर चित्रण लेखिकेने केले आहे.

"चंद्रिके ग सारिके ग" [१४] कथेची नायिका सुहास ही गर्भश्रीमंत कुटुंबात जन्मलेली असून जन्मत:च तिच्या वाटयाला केवळ प्रेमच आले आहे. ती उच्च शिक्षित आहे. चार चौघीत उठून दिसणारी आहे. तिला लग्न करणे बिलकुल अवघड नाही. तिचे "मिकेल" नावच्या उच्च शिक्षित, श्रीमंत अमेरिकन तरुणाशी दृढ प्रेमसंबंध येतात. पण लग्नाची बेडी पायात अडकून न घेता ती मायदेशी परत येते. ती म्हणते, "नवरा म्हणून कुणीतरी पुरुष लागतोच का आयुष्यात ? इतर बरेच पुरुष आहेत की मला ! भाऊ, वडील, मित्र सुध्दा !" (पृ.क्र.१३५) तिच्या विचारावरुन केवळ नवरा म्हणून समाजाने मान्य केलेल्या पुरुषाचीच निकड स्त्रीला असते हे तिला मान्य नाही. तर विवाहाशिवायही ती आपल्या स्व कर्तृत्वावर जगू शकते व पिता-पुत्री, भाऊ-बहिण, मित्र-मैत्रिण, प्रियकर-प्रेयशी या पवित्र नात्यांना ती जोपासते. प्रत्येक नाते ती भावनिकतेच्या पातळीवर कुरवाळते व अत्यंत प्रांजळपणे जोपासण्याचा प्रयत्न करते. लग्नाच्या बेडीत अडकून न पडता ती आजीवन अविवाहित राहून प्रत्येक नाते अत्यंत शुध्दतेने निभावण्याची धडपड करते. तिने पारंपरिक विवाह पध्दतीला, संस्थेला एक हादराच दिलेला आहे.

"जाग" [१५] मधील वत्सलाबाई, चाळीशी ओलांडलेली विधवा, दोन तरुण मुलांची आई. थोरली मुलगी नर्स असून ती विवाहित आहे. वत्सला लोकांचे घरकाम करुन स्वत:चा उदरनिर्वाह करणारी आहे. कामाच्या निमित्ताने ती मुंबईला जाते. आपल्या भारतीय संस्कृतीनुसार प्रत्येक घटनेला ठराविक वयोमान नेमले गेलेले आहे. या वयोमानातच त्या त्या घटना घडणे इष्ट मानले जाते. वत्सलाबाईंनी चाळीशी ओलांडलेली असल्यामुळे व त्या विधवा असल्यामुळे त्यांच्या बाबतीत गैरवर्तन किंवा परपुरुष आकर्षण निर्माण होईल अशी कोणालाही शंका येत नाही. मात्र घडते वेगळेच. त्या बाईचे गोपाळ नावाच्या पुरुषाशी प्रेमसंबंध प्रस्थापित होतात. अखेर वत्सलाबाई गावी न परतता गोपाळ बरोबर मुंबईला त्याच्या झोपडीत

राहण्याचा धाडसी निर्णय घेतात. हे मनाला खटकते. जेव्हा तिची मालकिण तिला याविषयी विचारते तेंव्हा ती उत्तर देते, "लग्न करायला गोपाळ केवढा, मी केवढी .। अहो तसंच आपलं .। ठेवील तितके दिवस ठेवील .। मग पुन्हा आहेच की, जन्माची दडदड. दुसऱ्याच काम .। ते कुठं चुकलय ." (पृ.क्र.१४२) या निर्भीड मनोवृत्तीच्या स्त्री ने परंपरागत विवाह रूढी प्रथांना पूर्णपणे झुगारून देऊन एक प्रकारचा आदरा दिलेला आहे. ती अतिशय निर्भीड आहे. एकदा होरपळल्यानंतरही पुन्हा एका अशा पुरुषाच्या मोहजालात अडकते. त्याच्या विषयी तिला अजिबात कल्पना नाही. योगा-योगाने भेट होते आणि परस्पर आकर्षण निर्माण होते. शेवटी ती तो ठेवील तितके दिवस त्याच्या बरोबर रहायला बिनदिक्कतपणे तयार होते.

विभावरी शिरुरकरांनी "हिंदोळयावर" [१६] या स्त्री समस्याप्रधान कादंबरीत मध्यमवर्गीय पांढरपेशा वर्गातील स्त्रीच्या सोशिकतेचे व पुनर्विवाहाच्या विचाराने विचलित झालेल्या मन:स्थितीचे अलवार चित्रण केले आहे. "अचला" ही मध्यमवर्गीय पांढरपेशा वर्गातील स्त्री नवऱ्याच्या वाईट वर्तणुकीला कंटाळून माहेरी निघून येते आणि इथे आल्यावर तिचा एका तरुणाशी परिचय होतो. तो वकील आहे. तीही मास्तरणीची नोकरी करु लागते. दोघे वैचारिक पातळीवर एकत्र येतात. तो तिला विवाहाची मागणी घालतो. पण त्याची मागणी मान्य करावी का न करावी या हिंदोळयावर तिचे मन हेलकावे घेत राहते. पण तिच्या घरातील मोलकरीण मात्र आपल्या नवऱ्याला सोडून आल्यावर सहजपणे पाट लावते.

मध्यमवर्गीय बुध्दीजीवी पांढरपेशा वर्गातील नीतीमूल्ये आणि कनिष्ठ वर्गातील समाजाची नीतीमूल्ये ही भिन्न भिन्न असतात. कनिष्ठ समाजात पाट लावणे वगैरे सारखे प्रकार सहजभावनेने घडत असतात. त्याचा फारसा गांभियाने विचार केला जात नाही. मात्र मध्यमवर्गीय बुध्दीजिवी समाजात ती फार मोठी बंडखोरी मानली जाते याचे दर्शन या कथेत घडते.

एकाच समाजातील दोन वेगवेगळया पोट समुहाचे दर्शन इथे घडविले आहे. विभावरीबाईंनी हे चित्रण अत्यंत भावनिक पातळीवर केलेले दिसते. पण गौरी देशपांडे ह्या असे चित्रण अत्यंत अलिप्तपणे, तटस्थपणे घडविताना दिसतात.

"देणं" [१७] या कथेची नायिका 'अनिता सिंग' मुळची अमेरिकन आहे. तिने साजन सिंगशी विवाह केला. पण जेव्हा तिला मूल नको असताना दिवस जातात तेव्हा ती गर्भ पाडून टाकण्याचा निर्णय घेते. मात्र साजनचा याला विरोध असतो. आपण बाप बनणार म्हणून त्याला अत्यानंद होतो. पण पत्नीचा विचार ऐकून तो घाबरतो. तिला तसे न करण्याविषयी गया-वया करतो. मात्र ती त्याला दाद देत नाही. उलट म्हणते, "तुझ्या देशात बायकांना मुल निर्मिण्याचं यंत्र समजत असतील फार तर, पण मी अमेरिकन आहे. केवळ मादी म्हणून जगत माझं व्यक्तिमत्व, बुध्दी सारं गुंडाळून नाही ठेवायचं मला. मुलाला जन्म केव्हा द्यायचा, किंवा तो द्यायचा की नाही हे सर्वस्वी मी ठरवणार", (पृ.क्र.९८ ) भारतासारख्या संस्कृतीप्रधान देशात पुरूषाला अग्रक्रम आहे, मानाचे स्थान आहे. त्याच्याच इच्छेप्रमाणे पत्नीने आपले जीवन जगण्याची रूढी आहे. पण अनिता मात्र वेगळी आहे. तीची नीतीमूल्ये वेगळी आहेत. विचार करण्याची पध्दती वेगळी आहे. ती स्वतंत्र विचार करणारी आहे. त्यामुळे तिचा विवाह संस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे भिन्न आहे. असे असले तरी पुरवातीला गर्भ पाडू इच्छिणारी अनिता साजनसिंगचा अपघातात मृत्यु झाल्यानंतर त्याचा गर्भ वाढवू इच्छिते. इथे एक विवाह संस्थेचे वेगळे रूप दिसून येते.

"एकेक पान गळावया" [१८] ची नायिका राधा स्वतंत्र विचाराची आहे. "स्व"ला जपणारी आहे. ती माधवची पत्नी आहे. फरहद व माधव हे दोघेही जीवलग मित्र व दोघेही राधावर अंत:करणापासून प्रेम करतात.

पण माधव व राधा विवाहबध्द होतात व फरहद मात्र राधाच्या आठवणी कुरवाळत अविवाहित राहतो. माधव व राधाचा संसार नीट चाललेला असतो. तीला तीन मुले होतात. पण फरहद विवाह न करता राधाची वाट पहातच राहतो. माधवचा मृत्यू होतो, तेंव्हा राधाने वयाची पन्नाशी ओलांडलेली असते. तरीही फरहद तिला लग्नाची मागणी घालतो. तिला हा पुनर्विवाह करणे अवघड नव्हते. पण ती या विवाहास होकार देत नाही तर उलट म्हणते, "अरे ! लग्न केलंच पाहिजे का ? लग्नाशिवाय ही आपण एक-मेकांचे चांगले मित्र म्हणून राहू शकतोय ना." इथे लग्न न करता विधवा झाल्यानंतर भूतकाळातील प्रियकराशी ती विवाहबाह्य संबंध ठेवण्यास तयार होते. हे एक विवाह संस्थेचे वेगळे रूप गौरीबाईंनी रेखाटले आहे.

अशाप्रकारे विवाहसंस्थेची वेगवेगळी रूपे गौरीबाईंच्या साहित्यात चित्रित झालेली दिसतात.

विवाह संस्थेचे रूप दर्शविणारी रूपे डॉ. केतकर यांच्या "ब्राह्मण-कन्या" [१९] या कादंबरीत विवाह संस्थेची विविध रूपे चित्रित झालेली दिसतात. विषम विवाह, विषम विवाहातून उत्पन्न झालेल्या संततीचे वादग्रस्त सामाजिक स्थान, कुमारी मातृत्व, आंतरधर्मिय विवाह अशी विवाह संस्थेपुढील अनेक प्रश्नचिन्हे दाखवून केतकरांनी विवाह संस्थेच्या अपुर्णतेचे दर्शन घडविलेले दिसते. तसेच "विचक्षणा" [२०] या कादंबरीला "महाराष्ट्रातील विवाह संस्थेचे स्वरूप असे एकसुत्र असलेले दिसते. विवाह संस्थेची अपूर्णता, वेश्यासंस्था, गुरूसंस्था आणि कुटुंबसंस्था यांचे विवाह संस्थेशी असलेले अंतरीक संबंध या कादंबरीमध्ये चार कथानकाच्या एकत्रिकरणातून चित्रित केलेले आहेत.

डॉ. केतकरांनी आपल्या कादंबऱ्यामधून जे रूप चित्रित केले आहे ते समाजशास्त्रिय दृष्टिकोनातून केले आहे. मानवी भाव भावना लक्षात न घेता परिस्थिती अधिक महत्वाची मानुन अलिप्तपणे आणि तटस्थपणे केलेले

चित्रण या कादंब-यांत आहे. समाजशास्त्रीय पाया लाभल्यामुळे हे चित्रण गंभीर तसेच विवाह संस्थेचे अनेक अंगानी दर्शन घडविणारे असे आहे.

गौरी देशपांडे यांच्या कथामध्ये विवाह संस्थेचे चित्रण करणे असे आशयसूत्र असले तरी त्याला डॉ. केतकरांच्या एवढा व्यापक समाजशास्त्रीय पाया नाही. एकांगी अशा स्त्रीवादी भूमिकेतून केलेले हे चित्रण काहिसे अभिनिवेशी वाटते. बंडखोर स्त्रीचे विवाह संस्थेला दिलेले आव्हान हा खरेतर मोठा सामाजिक प्रश्न आहे. पण गौरी देशपांडे यांच्या कथांमध्ये तो असा सामाजिक प्रश्न म्हणून येत नाही तर बंडखोरीची भरजरी झूल पांघरून येतो.

४) मानवी नाते संबंधाचे चित्रण :

स्त्रीला केंद्र कल्पून कथा निर्मिती करणा-या गौरी देशपांडे यांच्या कथांमध्ये मानवी नातेसंबंधाची विविध रूपे चित्रित झालेली दिसतात. जेव्हा स्त्री चार भिंतीतील आपले भावविश्व ओलांडून बाहेर पडते तेव्हा तिचा समाजातील सर्व घटकांशी, सर्व स्तरावरील पुरुष वर्गाशी संबंध येतो. तिचे कुटुंबातील व्यक्तींशी, वेगवेगळया प्रकारचे नाते असतेच. पती-पत्नी, सासू-सून, आई-मुले, नणंद-भावजय अशा महत्वपूर्ण नात्यांनी ती कुटुंबाशी बांधली गेलेली असते. जेव्हा ती उंबरठा ओलांडून समाजात वावरते तेव्हाही ती समाजाशी वेगवेगळया नात्यांनी बांधली जाते. मैत्रिण-मैत्रिण, मित्र-मैत्रिण, प्रियकर-प्रेयसी, बॉस-सेक्रेटरी, अशी नाती निर्माण होतात. या वेगवेगळया नात्याचे चित्रण गौरी देशपांडे अत्यंत प्रभावीपणे करतात.

आजची स्त्री पारंपरिक नीतीमूल्यांना फाटा देऊन बदलत्या जीवनाशी समन्वय साधण्याचा अटोकाट प्रयत्न करते आहे. ती धीट आहे. ती प्रत्येक निर्णय स्वत:चे स्वत: पूर्ण विचारांती घेते. पारंपरिक प्रथा, रूढींना जोपासत न बसता स्वत:च्या अस्तित्वाची जाण ठेऊन ती आपले वर्तन करते. बदलत्या

काळाबरोबर ती ही बदलते आहे. भारतीय मध्यमवर्गीय संकुचित अशा स्त्रीजीवनविषयीच्या कल्पना आता जवळजवळ लोप पावल्या आहेत. काळ बदलतो आहे आणि हा बदल घराच्या उंबरठयाच्या आत येऊन पोहोचला आहे, असे त्यांच्या कथांतून जाणवते. त्यांच्या कथांतून बदलू पाहणारे स्त्रीमन व्यक्त होते.

"चूल आणि मूल" हे तिचे छोटेसे विश्व ते व्यापक होवू लागलेले आहे. तसतशा तिच्या मनाच्या कक्षा रुंदावू लागल्या आहेत. तिची स्वत:कडे पाहण्याची दृष्टी बदलली, नात्याचे अर्थही बदलू लागले. ती बुध्दिवादी व सडेतोड होऊ लागली. प्रेम, परिणय, लग्न, मुले, कुटुंब आणि त्यांच्याशी असणारी नाती या स्थितीमध्ये जगणारी ही आधुनिक स्त्री पुर्वीच्या स्त्रीयांपेक्षा कशी निराळी आहे हे अनेक कथांद्वारे गौरीबाईंनी व्यक्त केलेले आहे.

समाजाने आणि कुटुंबाने स्त्रीवर कांही भूमिका सोपविलेल्या असतात व त्याच भूमिकांनी तिने जगावे असा प्रकट व अप्रकट आग्रह असतो. त्यात स्त्रीची "माता" ही भूमिका फारच महत्वाची मानली जाते.

वास्तविक ती आई असण्यापूर्वी बायको असते. पती आणि पत्नी यांचे नाते दीर्घकालपर्यंत सहजीवनाची मागणी करणारे असते. तर या उलट मुलांचे आणि आईचे असते. हे नाते थोडा काळच शारीरिक आणि नंतर भावनिक असते. पण आईने मुलांसाठी स्वत:ची इच्छा, आवडी-निवडी आणि वेळ पडल्यास वैवाहिक सुखाचा ही त्याग तिने केला पाहिजे, स्वार्थत्याग केला पाहिजे. तरच ती "मातृदेवता" ठरते. पण "एकेक पान गळावया" तील राधा तसे करीत नाही म्हणून ती आई म्हणून अपयशी ठरते. मुले तिला दुरावतात. ती मुलांवर अवलंबून नाही. मुलांच्या आधाराने तिला जगायचे नाही. व्यक्ती जगताना अनेक भूमिकेतून जगत असते. एरवी मुलांनी

आपले "करावे" ही ही एक भूमिका या भूमिकांमध्ये येते. भूमिकांचे हे ओझे "एकेक पान गळावया"मध्ये [२१] अनेक प्रकारांनी दाखविलेले आहे.

राधा, माधवची "बायको" म्हणून फरहदच्या खांद्यांवर डोके ठेवून रडणे वाईट, तिचे माधववर "प्रेम" म्हणून तिने माधवची इच्छा असूनही त्याचे मृत शरीर हॉस्पीटलला देणे कसेचेच वाटायला लावणारे, नीरा ही अंबू आणि गणेशाची बहिण म्हणून ज्यायोगे गणेशाच्या प्रॅक्टीसवर आणि अंबूच्या मासरवर परिणाम होईल म्हणून बलवंतशी असणारे नीराचे आक्षेपार्ह संबंध तिने ठेवता कामा नयेत अशी अनेक बंधने राधावर अप्रत्यक्षपणे आहेत. कुटुंबातील नातीही व्यक्ती जीवनावरची ओझी बनत जातात. कारण या नात्यांना भूमिका, आक्षेप चिकटतात. शिवाय ही नाती "निवडीतून" आलेली नसतात. अनेकदा ही आपल्या मनाविरुध्द चिकटतात.

"एकेक पान गळावया" या कथेत राधा व माधव हे आधुनिक विचाराचे, एकमेकाबद्दल आत्मविश्वास, प्रांजळ प्रेम, उदात्त व तर्कशुध्द विचार करणारे जोडपे आहे. त्यांना गणेश, नीरजा, अंबू अशी तीन मुले आहेत. ही तिन्ही मुले परिपक्व आहेत. बालपणापासूनच शिक्षणाच्या निमित्ताने हॉस्टेलवर ठेवल्यामुळे या मुलांच्या मनात आई-वडिलांविषयी फारशी आपुलकी नाही. उलट अर्थी ते त्यांचे कर्तव्यच आहे, उपकार नव्हे.अशी त्यांची धारणा दिसते. माधवच्या मृत्यूनंतर पारंपरिक दुःखद भावनांना न कवटाळता प्रत्येक जण लगेचच सावरतो आणि उच्चभ्रू समाजाला साजेसे असे वर्तन करतो. रडणे, शोक करणे हे त्यांना अप्रतिष्ठेचे वाटते. हे चित्र आपल्या मनाला धक्का देणारे आहे. पती-पत्नी माता मुले यांच्यातील संबंधाचे चित्रण गौरीबाईंनी अत्यंत सतर्कतेने केलेले आहे. तर फरहद आणि राधा यांच्यातील प्रेम संबंधाचे चित्रण करताना अत्यंत सावधपणे केलेले आहे. फरहद व माधव हे दोघे परममित्र. दोघांचेही राधावरच प्रेम असते. राधा आणि माधव

पती-पत्नी या नात्यानी जोडले जातात. फरहद मात्र लग्न न करता राधाच्या आठवणी जोपासत अविवाहित राहतो. त्यांच्या या संबंधांची कल्पना सर्वांना असते. माधवचेही इतर स्त्रियांशी संबंध असतात. पण कुणीही कुणाच्याही संबंधावर आक्षेप घेत नाही. प्रत्येक जण आपआपल्या परीने जगत असतो. कुणीही कुणावर आपली मते लादत नाही. माधवच्या मृत्यूनंतर फरहद वयाची पन्नाशी ओलांडलेल्या राधाला लग्नाची मागणी घालतो. परंतु राधा मात्र म्हणते, "लग्न केल्यानेच सर्व काही साधता येते का ? चांगले मित्र या नात्याने आपण आजपर्यंत जसे जगलो त्याच नात्यांनी ठीक आहोत." येथे फरहदचा त्याग आणि राधाचा निर्णय यांचे चित्रण गौरीबाईंनी सूक्ष्मतेने रेखाटले आहे.

राधा-माधव यांच्यातील नातेसंबंध, राधा-फरहद यांच्यातील नातेसंबंध, राधा व मुले यांच्यातील नातेसंबंध, माधव व मुले यांच्यातील नातेसंबंध हे सामाजिक चौकटीत न करता वेगळ्या प्रकाराने गौरीबाईंनी चित्रित केले आहेत.

मैत्रिणी-मैत्रिणीतील मैत्रीचे पवित्र नाते जोपासणा-या "चंद्रिके ग, सारिके ग" [२२] या दीर्घ कथेतील नायिका सुहास आणि मालविका यांच्यातील नातेसंबंध गौरीबाईंनी अत्यंत तरल व स्वाभाविकपणे रेखाटण्याचा सार्थ प्रयत्न केला आहे. या दोघी कॉलेजातील वर्गमैत्रिणी. मालविका सुस्वरूप देखणी आहे. तर सुहास सर्वसामान्य रूप असलेली परंतु गर्भश्रीमंत कुटुंबातील, चार भावांमध्ये एकटीच लाडकी असल्यामुळे जन्मल्यापासूनच तिच्या नशिबी प्रेमच असते. मालविका आणि सुहास यांचे हे मैत्रिचे नाते नणंद आणि भावजय या स्वरूपात बदलते. दोघीही उच्चशिक्षित, नोकरी करणा-या, स्वतंत्र आणि तर्कशुध्द विचार करणा-या स्त्रिया आहेत. या दोघीही या दोन्हीही नात्यांना तितक्याच प्रांजळपणे जपतात. सुहास "पीएच्.डी." ही अत्युच्च पदवी मिळवण्यासाठी अमेरिकेला जाते. संख्याशास्त्रातील डॉक्टरेट मिळविलेला,

डॉक्टरेट, हुषार व सुस्वभावी मिचेलशी तिचे प्रेम संबंध जुळतात. प्रेमाचा हा वृक्ष फुलत असतानाच "पीएच्.डी."ची पदवी प्राप्त होताच सुहास आपले आई-बाबा, भाऊ, मालविका यांच्या ओढीने मायदेशी परतण्याचा ठाम निश्चय करते. मिचेलला फार दु:ख होते. परंतु त्या क्षणभंगुर मोहजालात अडकून न पडता ती परत येते. या दरम्यानच्या तिच्या मन:स्थितीचे अत्यंत बोलके चित्रण लेखिकेने केले आहे.

भावा-बहिणीतील प्रेम, मैत्रिणी-मैत्रिणीतील प्रेम, मित्र-मैत्रिणीतील प्रेम, प्रियकर-प्रियशीतील प्रेम, आई व मुले यांच्यातील प्रेमाचे उदात्त चित्रण गौरीबाईंनी अत्यंत नाजूक व परिणामकारकपणे केले आहे.

त्याचबरोबर वस्तीत रहात असताना 'पॉल' नावाच्या प्रौढ व्यक्तिशी तिचे निर्माण झालेले मैत्रिचे संबंध व त्यांच्यात निर्माण झालेल्या आकर्षणाचे हळूवार चित्रण त्यांनी केले आहे. मानवी नाती ही कोणकोणत्या स्तरावर व ती कशकशी जोडली जातात याचे चित्रण गौरी देशपांडे यांनी "चंद्रिके ग सारिके ग" या कथेत अत्यंत परिणामकारकपणे केले आहे.

"देणं" [२३] या कथेची नायिका अनिता आणि साजनसिंग ही दोन्ही वेगवेगळ्या देशातील माणसं. बर्कलेस डॉक्टरेटचे शिक्षण घेत असताना एक-मेकांच्या प्रेमात पडतात व विवाह करून पती-पत्नी या नात्यानं जोडली जातात. साजनसिंग भारतीय आहे, अनिता अमेरिकन. साजनला तीन बहिणी व डॉक्टर बाप आहे. डॉक्टर बनून आपल्या मुलाने आपल्या गावी परत येऊन इथल्या लोकांची सेवा करावी अशी त्यांची इच्छा असते. कारण ते स्वत: अखंड, निस्वार्थपणे लोकांची सेवा करीत असतात. साजन मात्र अनिताशी लग्न करून तिथेच अमेरिकेत स्थायिक होतो. अनिता मुक्त विचाराची, स्वतंत्र विचाराची आहे. ती आपल्या करिअरला अधिक महत्व देणारी आहे. तिला दिवस जातात. आपली पत्नी गर्भार आहे हे ऐकून साजनला अत्यानंद

होतो. मात्र अनिताला मुल नको असल्याने ती त्याला म्हणते, "मला मूल नकोच आहे खरं तर.। निदान एवढयात तरी. मी परवासाठी हॉस्पिटलला अपॉईंटमेंसुध्दा घेतलीय." (पृ.क्र.९८ ) हे ऐकूण त्याला धक्काच बसतो व तो असे करण्यापासून तिला परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो. तेंव्हा ती त्याला तुच्छतेच्या स्वरात म्हणते, "केवळ मादी म्हणून जगत माझं व्यक्तिमत्व, बुध्दी सारं गुंडाळून नाही ठेवायच मला. मुलाला जन्म केंव्हा द्यायचा, किंवा तो द्यायचा की नाही हे सर्वस्वी मी ठरवणार, समजलास ?" हे ऐकून तो तिच्याकडे दयेची भीक मागतो. पण त्यावर ही ती म्हणते, "यात इतकं भावनाविवश होण्यासारखं काय आहे ? मूल-मूल कसलं ? तो नुसता कांही पेशींचा ठिपका आहे." (पृ.क्र.९८-९९) तिच्या मनातील हा तुच्छभाव काळजाला हादरा देणारा आहे.

त्याच दिवशी साजन कामाला जातो. पण बसला अपघात होऊन तो त्यात मरण पावतो. या घटनेमुळे गर्भपाताची वेळ टळून जाते व हळूहळू जीव वाढू लागतो. अपरिहार्यपणे तो तिला जोपासावा लागतोच. त्याच बरोबर तिच्यात बराच बदल झालेला दिसून येतो. साजनच्या मृत्यूची तार ती दिल्लीला त्याचा वडिलांना पाठविते. प्रत्युत्तर येत नाही व सहा आकडी चेक साजनच्या मृत्यूची भरपाई म्हणुन मिळतो. तेंव्हा अनिता तो चेक घेऊन साजनच्या वडिलांना भेटण्यास दिल्लीला येते. अनंत अडचणी येतात. पण सर्वांवर मात करून आपले हे कर्तव्य आहे, याची पूर्ती करावी म्हणून ती "पिटर"ला घेऊन येते. दिल्लीपासून "रुकडी" नावाचे छोटेसे खेडेगांव. तेथील ते वातावरण आजारी डॉ. विशंभर सिंग (साजनचे वडील). तिला पाहून खुश होतात. नातवाला पाहून खुश होतात. त्यांना अर्धांगवायूच्या झटक्याने पछाडलेले आहे. या अवस्थेतही ते रोग्यांची शुश्रुषा करतात. त्यांची ही अवस्था पाहुन तिला कीव येते. ती आपले इथे येण्याचे कारण सांगते, तेव्हा ते तीची वाहवा करतात. जे आपल्या मुलाने आपले कर्तव्य पार पाडले नाही

ते तू पाहलेस म्हणून तिची ते वाखाणणी करतात व त्या चेकच्या रकमेचे पाच भाग करून त्यातील एक भाग पिटरसाठी देऊ करतात. ते ती नाकरते तेव्हा तिचं कौतुक न करता उलट ते अमेरिकेतील अनाथ मुलांना वाटण्यास सांगतात. तेव्हा तिला त्यांच्या करारीपणाची प्रत्यय येतो. ती कांही न म्हणाता बाहेर येते. कंपौंडर बहादुरला त्यांच्या मुलीविषयी विचारणा करते. तेव्हा त्या तिघींचाही मृत्यू झाल्याचे कळते व डॉक्टरांची ही अवस्था कशामुळे झाली हे ही कळते. तेव्हा तिला वाटते की, डॉक्टरनी साजनला वात्सल्य प्रेम दिलेलेच नाही. जर पिता-पुत्रात आपुलकी असती तर तो निश्चित त्या ओढीने परत आला असता व आपल्या कर्तव्याला जागला असता. परंतु डॉक्टरांची ही सेवाभावी वृत्ती पाहूनही तिला कीव येते आणि तिच्या मनात एक विचार चमकून जातो व आपल्या इवल्याशा पोराला (पिटरला) ती बोलून जाते, "लक्षात ठेव. म्हाता-या आईबापांची काळजी घेणं हे मुलांच कर्तव्य आहे. ते एक देणं त्यांना फेडायलाच लागते.!" (पृ.क्र.११४ ) हा तिच्यातील बदल बरचसच कांही सांगून जातो. इथे प्रियकर - प्रेयसी, सासरा - स्नुषा(सून)आप्त स्वकीयांपेक्षा समाजातील इतर घटकांशी प्रस्थापित झालेल्या मानवी नात्यातील अलवार भावनांच्या नाते संबंधाचे चित्रण लेखिकेने अत्यंत बारकाईने व परिणामकारकपणे केले आहे.

"तेरूओ" [२४] या दीर्घ कथेत पाश्चात्य देशातील पुरुषाबरोबरच भारतीय स्त्रीचे (विवाहित) मैत्रीचे, प्रेमसंबंधाचे चित्रण केले आहे. कथेची नायिका मुक्त विचार सरणीची आहे. ती नंदनची पत्नी आहे. ती नंदन बरोबर जपानला जाते व तिला तेथे "तेरूओ" भेटतो. ती त्याच्या प्रेमात पडते. तो ही विवाहित आहे. प्रौढ आहे. मोठ्या वयाच्या दोन मुलींचा बाप आहे. पण त्याच्याविषयी तिला आकर्षण निर्माण होते व ती दोघे एकमेकांच्या प्रेमात पडतात. ती त्याच्यावर मुक्तपणे प्रेमाचा वर्षाव करते. तिला "तेरूओ"च्या

रूपाने जणू भूरळच पाडलेली आहे. अनाहुत आकर्षण निर्माण झालेलं आहे. ती त्याला म्हणते, "तुझ्याशी जे माझं नातं आहे ते तुझ्याशीच असणे शक्य आहे. तो तिला याचे कारण विचारतो तेव्हा ती म्हणते, कारण "तेरूओचेच डोळे इतके हसरे आहेत आणि तेरूओचेच ओठ इतके बाकदार आहेत आणि तेरूओचचं शरीर असं मजबूत नितळ आहे आणि तेरूओचीचं पावले ही अशी नाजुकशी..." हे तिचे धाडस आणि विवाहित स्त्रीने परपुरुषाशी अनैतिक संबंध ठेवण्यात कांहीही गैर न मानणे, आणि शारीरिक आकर्षणाचे असे स्पष्ट उच्चारण करणे हे आपल्याला थोडेसे न पटणारे, अनितीचे वाटते. परंतु ती मुक्त, स्वैर असल्याने तिला यात वावगे कांही वाटत नाही. तसेच स्पष्ट, धिट, मोकळे शृंगारमूलक आणि आकर्षणाचे निव्वळ शारीरिक संबंध "तेरूओ" या कथेत आलेले दिसतात.

"थांग" [२५] मधल्या कालिंदीचेही दिमित्रीशी प्रेमसंबंध येतात. कालिंदी भारतीय संस्कृतीतील स्त्री आहे. ती विवाहित असूनही पर-पुरुषाच्या प्रेमात पडते. या नायिका मर्यादा ओलांडून जातात पण त्यांना त्यांचे कांही वाटत नाही. कारण त्या मुक्त व स्वैर जीवन जगणाऱ्या आहेत. महानगरीतल्या व उच्चभ्रू समाजातील, पाश्चात्य संस्कृतीचा सहवास लाभलेल्या या निर्भीड नायिकांचे चित्रण गौरी देशपांडेनी केले आहे. अशी जी नाती निर्माण होतात त्या नात्यांचे चपखल वर्णन, चित्रण व ही नाती जोपासताना निर्माण होणाऱ्या भावनांचे मन:स्थितीचे चित्रण गौरी देशपांडेनी अत्यंत बारकाव्याने केलेले आहे.

मैत्री हे नाते, जे दोन जाती-धर्म वा देश यांच्या मर्यादा ओलांडून गाणाऱ्यामधल्या सौहार्दातून निर्माण होते, मिळालेले नसून निवडलेले असते. त्याचे मोल अधिक आहे. हे दाखविणारी अनेक पात्रे गौरी देशपांडे यांच्या लेखनात वावरतात. नात्यांमधून कांही अपेक्षा कशा निर्माण होतात, याचे

मिश्किल वर्णन ही त्यांच्या कथांतून येते.

गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्यामध्ये नाते संबंधाचे चित्रण केलेले आहे. सर्वच साहित्यात नातेसंबंधाचे चित्रण असते. हे तर खरेच पण गौरी देशपांडे यांनी विशेषत्वाने स्त्रीला मध्यवर्ती कल्पून नातेसंबंधाचे चित्रण केले आहे. त्यामुळे या चित्रणात स्त्री चे पतीशी, मित्राशी, प्रियकराशी आणि जाणत्या मुलांशी असणाऱ्या नाते संबंधाचे चित्रण प्राधान्याने आढळून येते.

सारांश :

गौरी देशपांडे यांच्या कथात्म वाङ्मयातील आशयसूत्रांचा विचार करताना आपल्याला प्रामुख्याने -

१) पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील स्त्रीची कुचंबणा,
२) स्वतंत्र व्यक्तित्वासाठी संघर्ष/मुक्त होण्याची आकांक्षा,
३) विवाह संस्थेचे रूप,
४) मानवी नाते संबंधाचे चित्रण.

यांचा विचार करावा लागतो. यापैकी स्त्रीच्या कुचंबणेचे चित्र पार्श्वभूमी दाखल झालेले आहे. त्याचे प्रमाणही कमी आहे. आणि रंगभूमी-वरील स्थिर पडद्यासारखे काहीसे त्याचे स्वरूप आहे. या पार्श्वभूमीवर स्वतंत्र व्यक्तित्वासाठीचा संघर्ष करणारी स्त्री चित्रित करणारे आशयसूत्र दिसून येते. यामुळे ह्या दोन्हीचा अपरिहार्य संबंध म्हणून विवाह संस्थेचा अभिप्राय कथांमधून व्यक्त होताना दिसतो. कारण कुचंबलेल्या स्त्रीचे जीवन आणि पारंपरिक समाजाविरुद्ध बंड व मुक्त होण्याची आकांक्षा या दोन्ही गोष्टी विवाह संस्थेपुढे प्रश्नचिन्ह उभी करतात. असे घडत असताना बदललेल्या आणि बदलणाऱ्या नातेसंबंधांचे चित्रण होणे अपरिहार्य ठरते. किंबहुना अशा नाते-

नातेसंबंधाचे चित्रण करुन एक विशिष्ट असा स्त्रीवादी दृष्टीकोन अभिव्यक्त करण्याचा लेखिकेचा हेतू जाणवतो.

अशाप्रकारे गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्यामध्ये उपरिनिर्दिष्ट चार आशयसूत्रे दिसून येतात. थोडा अधिक बारकाईने विचार केला तर ही वेगवेगळी आशयसूत्रे नसून एकाच आशयसूत्राचे वेगवेगळे पदर आहेत असे म्हणावे लागते. स्त्रीवादी भूमिकेतून आधुनिक काळातील मध्यमवर्गीय समाजातील वीशी ओलांडून गेलेल्या लोकांचे जीवनचित्रण असे एक स्वरुप या सर्व लेखनाला असलेले दिसून येते. गौरी देशपांडे यांच्या साहित्यामध्ये एकाच आशयसूत्राचे विविध पदर दिसून येतात.मात्र त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीत हे सर्व पदर एकाच वेळी नसतात. किंबहूना असे दिसून येते की, त्यांच्या एका साहित्य कृतीमध्ये आशयसूत्राचा एकच विशिष्ट पदर अधिक तीव्रतेने आणि स्पष्टपणे आविष्कृत होतो.

गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्यामध्ये काही कथा आहेत आणि कांही कादंबऱ्या आहेत अशी नोंद दिसून येते. कथा आणि कादंबरी यांच्यामध्ये आशयाच्या अनुषंगाने फरक करावयाचा झाला तर त्या संबंधातील भालचंद्र नेमाडे यांनी केलेली मिमांसा अधिक ग्राह्य ठरते. या मिमांसेप्रमाणे,

"लघुकथा हा कमी लांबीचा, चिंचोळा भाषिक अवकाश पुरवणारा, एकसुरी आशयसूत्रातून स्थलकालाचे संकुचित, म्हणून तीव्र, संवेदन देणारा प्रकार आहे. दीर्घकथेत लांबी वाढते, अवकाश वाढतो तरी आशयसूत्र एकसुरी राहते."

"कादंबरीत आशयसूत्रे व त्यांचे पदर अनेक असतात त्यामुळे अवकाश प्रदीर्घ व विस्तृत होतो. लघुकथा - दीर्घकथा यांच्या उलट कादंबरीवर लांबीच्या किमान मर्यादा असतात. व्यामिश्र आशयसूत्रांमुळे हा अवकाश स्थळ व काळ यांना व्यापून त्यापलिकडे वास्तव सुचवित असतो." [२६] (पृ.क्र. २३)

वरील चर्चा ग्राह्य धरून गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्याकडे पाहिले तर असे दिसून येते की, या साहित्यामध्ये एकसुरी आशयसूत्र दिसून येते आणि त्यातून स्थलकालाचे परंतु संकुचित म्हणूनच तीव्र संवेदन दिले जाते. म्हणून आशयसूत्राच्या अनुषंगाने पाहिल्यास गौरी देशपांडे यांच्या कथात्म साहित्याचे स्वरूप कादंबरी सारखे नसून ते कथेसारखे आहे. पृष्ठांची संख्या अथवा कथेची लांबी हा घटक लक्षात घेतला तर "दुस्तर हा घाट" किंवा "एकेक पान गळावया" या सारख्या साहित्यकृतींना दीर्घकथा असे म्हणता येईल.

......

प्रकरण दुसरे

संदर्भसूची


१) शिरूरकर विभावरी - कळ्यांचे नि:श्वास, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण, १९३४.

२) देशपांडे गौरी - कावळ्या चिमणीची गोष्ट, आहे हे असं आहे, मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८६.

३) देशपांडे गौरी - ओहोटी, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

४) देशपांडे गौरी - याचसाठी, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

५) देशपांडे गौरी - राईट ऑन सिस्टर, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

६) शिरूरकर विभावरी - त्याग, कळ्यांचे नि:श्वास, उपरिनिर्दिष्ट.

७) शिरूरकर विभावरी - बाबांचा संसार माझा कसा होईल, कळ्यांचे नि:श्वास, उपरिनिर्दिष्ट.

८) देशपांडे गौरी - एकेक पान गळावया, मौज प्रकाशन, मुंबई, द्वि. आ. मार्च, १९८५.

९) देशपांडे गौरी - प्रवय, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

१०) देशपांडे गौरी - कावळ्या चिमणीची गोष्ट, आहे हे असं आहे, उ.नि.

११) देशपांडे गौरी - निरगाठी आणि चंद्रिके ग सारिके ग,
मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. नोव्हेंबर, १९८७.

१२) देशपांडे गौरी - ओहोटी, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

१३) देशपांडे गौरी - मुक्काम, मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ.१९९२

१४) देशपांडे गौरी - निरगाठी आणि चंद्रिके ग सारिके ग. उपरिनिर्दिष्ट.

१५) देशपांडे गौरी - जाग, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

१६) शिरुरकर विभावरी - हिंदोळ्यावर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,
पुनर्मुद्रण.

१७) देशपांडे गौरी - देणं, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

१८) देशपांडे गौरी - एकेक पान गळावया, उपरिनिर्दिष्ट.

१९) केतकर श्री.व्यं. - ब्राह्मण कन्या, विश्वनाथ प्रकाशन, पुणे,
पुनर्मुद्रण.

२०) केतकर श्री.व्यं. - विचक्षणा, किर्लोस्कर वाडी, किर्लोस्कर प्रेस,
१९२७.

२१) देशपांडे गौरी - एकेक पान गळावया, उपरिनिर्दिष्ट.

२२) देशपांडे गौरी - निरगाठी आणि चंद्रिके ग सारिके ग, उपरिनिर्दिष्ट.

२३) देशपांडे गौरी - देणं, आहे हे असं आहे, उपरिनिर्दिष्ट.

२४) देशपांडे गौरी - तेरुओ आणि कांहि दूरपर्यंत, मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८५.

२५) देशपांडे गौरी - दुस्तर हा घाट आणि थांग, मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. जुलै, १९८९.

२६) नेमाडे भालचंद्र - "कादंबरी", मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, संपा. गो.मा. पवार आणि म.द. हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८६.


.........